प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान (पीएम–जनमन)
अंतर्गत मोबाईल मेडीकल युनिट करीता

# रोजंदारी पध्दतीने पदभरती करीता थेट मुलाखत

प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान (पीएम–जनमन) योजने अंतर्गत जिल्हयात राबविण्यात येणाऱ्या मोबाईल मेडीकल युनिट मध्ये खालील पदे रोजंदारी पध्दतीने केवळ २९ दिवसा करीता भरणे करीता खालील पदांसाठी इच्छुक पात्र उमेदवारांची थेट मुलाखत खालील नमुद वेळापत्रका नुसार आयोजित करण्यात येत आहे. मुलाखतीचे स्थळ – **जिल्हा व्यवस्थापन कक्ष, राष्ट्रीय आरोग्य अभियान, जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय, जि.प.यवतमाळ** येथे कार्यालयीन वेळेत सोबत जोडण्यात आलेल्या अर्ज नमुन्यामध्ये पोस्टाद्वारे/व्यक्तीशः अर्ज सादर यावे.

## मोबाईल मेडीकल युनिट मधील रिक्त पदाचा तपशील

| अ.क्र | पदनाम | रिक्त पद संख्या व पदस्थापनेचे ठिकाण | शैक्षणीक अर्हता | प्रति दिवस मानधन |
|---|---|---|---|---|
| 1 | Medical Officer (Female) MBBS/AYUSH | २<br>१)घाटंजी/आर्णी<br>२)मारेगांव | MBBS/AYUSH पदवी असणे आवश्यक, कॉन्सिलचे नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक राहील. | १२९०/- |
| 2 | Pharmasist<br>औषध निर्माण अधिकारी | २<br>१)यवतमाळ<br>२)झरी जमाणी | DPharm/Bpharm<br>कॉन्सिलचे नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक राहील. | ५८१/- |
| 3 | Staff Nurse<br>अधिपरिचारीका | २<br>१)यवतमाळ<br>२) पांढरकवडा | GNM/BSc Nursing<br>कॉन्सिलचे नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक राहील. | ५८१/- |
| 4 | Lab Technician<br>प्रयोगशाळा तंत्रज्ञ | २<br>१)यवतमाळ<br>२)झरी जमाणी | 12th Science + DMLT<br>MPC कॉन्सिलचे नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक राहील. | ५८१/- |

## थेट मुलाखतीचे वेळापत्रक

| अ.क्र | पदाचे नांव | थेट मुलाखती चा दिनांक | थेट मुलाखती चा वेळ |
|---|---|---|---|
| 1 | Medical Officer (Female) MBBS/AYUSH | १६/०६/२५ | सकाळी ११ ते ३ |
| 2 | Pharmasist<br>औषध निर्माण अधिकारी | १७/०६/२५ | सकाळी ११ ते ३ |
| 3 | Staff Nurse<br>अधिपरिचारीका | १८/०६/२५ | सकाळी ११ ते ३ |
| 4 | Lab Technician<br>प्रयोगशाळा तंत्रज्ञ | १९/०६/२५ | सकाळी ११ ते ३ |

**अटी व शर्ती :-**

**विशेष सुचना = सदर पदे ही केंद्र शासनाचे** प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान (पीएम—जनमन) अंतर्गत मोबाईल मेडीकल युनिटसाठी २९ दिवसा करीता निव्वळ रोंजदारी पध्दतीने भरण्यात येत आहे.

१) सदर नियुक्ती ही पुर्नता रोजंदारी स्वरुपाची असुन निवड झालेल्या उमेदवरास फक्त २९ दिवसा करीता जाहिराती मध्ये नमुद पदनिहाय निश्चित प्रतिदिवस मानधन दिल्या जाईल. तसेच सदर नमुद योजनेस सन २०२५-२६ करीता वरिल पदास मान्यता न मिळाल्यास नियुक्ती आपोआप रद्द करण्यात येईल.

२) सदर पदे हि प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान (पीएम—जनमन) योजने अंतर्गत मंजुर असुन यांचा राष्ट्रीय आरोग्य अभियानातील कंत्राटी पदाशी कोणताही संबंध नाही. प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान (पीएम—जनमन) योजना बंद झाल्यास सदर पदस्थापना रद्द करण्यात येईल. नमुद पदाचे कोणत्याही परिस्थीतीत राष्ट्रीय आरोग्य अभियानात समायोजन होणार नाही.

३) अर्जदार हा संबंधित पदासाठी शारिरीक व मानसीक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदारा विरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखला झालेला नसावा.

४) वरिल तक्यातील सर्व पदाकरीता निवड प्रक्रीया ही प्राप्त अर्जाचे संख्येनुसार अर्जाची छाननी करुन पात्र उमेदवारांची गुणवत्तेनुसार एका जागेसाठी पाच या पध्दतीचा अवलंब करुन गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल. तसेच पात्र व अपात्र उमेदवारांची यादी व इतर माहिती www.zpyavatmal.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

५) अर्जदाराने अर्ज A4 आकाराच्या कोऱ्या कागदावर करावयाचा असुन (अर्जाचा नमुना www.pyavatmal.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे ) त्यामध्ये खालील बाबी अंतर्गत असाव्या

१. अर्जामध्ये ठळक अक्षरात स्वतःचे नाव, पदाचे नाव, कायमस्वरुपी राहत असलेला पत्ता, दुरध्वनी व भ्रमणध्वनी क्रमांक, जन्मतारीख, शैक्षणीक अर्हतेचे सर्व तपशील-अभ्यासक्रमाचे नाव, संस्था विद्यापीठाचे नाव, उत्तीर्ण झालेले वर्ष, (अंतीम वर्षातील गुणपत्रीका आवश्यक) गुणांची टक्केवारी, कामाचा अनुभव, – काम केलेल्या शासकीय / निमशासकीय संस्था/रुग्णलयाचे नाव, ज्या पदावर काम केलेले आहे त्या पदाचे नाव, कालावधी, पदाची जबाबदारी व मानधन/वेतन,नॉन क्रिमिनल प्रमाणपत्र, तसेच इतर सर्व माहिती नमुद करावी.

२. अर्जासोबत सत्यप्रतीमध्ये असलेले एस.एस.सी, एच.एस.सी गुणपत्रीका व प्रमाणपत्र शाळेचा दाखला, पदवी गुणपत्रीका (संपुर्ण वर्षाचे) व प्रमाणपत्र, पदव्युत्तर पदवी गणुपत्रीका व प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र / जात वैद्यता प्रमाणपत्र , नॉन क्रिमिनल प्रमाणपत्र पासपोर्ट आकाराचे १ फोटो अर्जा सोबत जोडण्यात यावे.उमेदवारानी अर्जासोबत सर्व सत्यप्रती जोडून **जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प.यवतमाळ** याकार्यालयाच्या ठिकाणी जिल्हा आरोग्य अधिकारी , जि.प. यवतमाळ यांचे नावाने सादर करावा.
**तसेच अर्जा सोबत आवश्यक कागदपत्रे/प्रमाणपत्रे जोडलेली नाही अश्या कागदपत्रे/प्रमाणपत्राचा विचार आक्षेपा मध्ये केला जाणार नाही.**

६) शासकीय/निमशासकीय संस्थेमध्ये कामकाज केल्याचे अनुभव प्रमाणपत्राची सत्यप्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील. तसेच अनुभव हा पदाच्या विषया संबंधीत आवश्यक राहील.(सदर अनुभव हा नियुक्ती करणाऱ्या अधिकारी यांच्या स्वाक्षरीने सादर करण्यात यावा.)

७) शासन निर्णय क्रमांक सचिव २०२३/प्र.क्र१४/कार्या १२ दिनांक ०३ मार्च २०२३ रोजीचा शासन निणर्या नुसार ( दोन वर्षे इतकी शिथिलता करण्यात आलेली आहे ) त्या जाहिरातीच्या दिवशी सदर पदासाठी कमाल वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी ४० वर्ष व मागासवर्गीय प्रवर्गासाठी ४५ वर्ष राहील. तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियांन अंतर्गत काम करणऱ्या कर्मचाऱ्याकरिता ५ वर्ष वयोमर्यादा मध्ये शिथील राहील.

८) सदर रिक्त पदांच्या संख्येत व मानधनात तसेच पदस्थापनेतच्या ठिकाणी बदल होऊ शकतो. सदर पदे रोजंदारी पध्दतीने भरावयाचे असल्याने ठरवुन दिलेल्या प्रतिदिवस मानधना शिवाय अन्य कोणताही भत्ता लागु राहणार नाही. तसेच मुलाखतीकरीता येणाऱ्या उमेदवारास दैनिक व प्रवास भत्ता व इतर कोणताही भत्ता कार्यालया कडून मिळणार नाही.

९) **निवड प्रकिया (अ व ब प्रमाणे) राहील**:-

गुणांक पध्दती - सर्व पदाकरिता गुणांकन पध्दतीनुसार

निवड प्रक्रिया खालीलप्रमाणे राबवावी. (१०० गुणाची)

| विवरण | तपशील | अधिकतम गुण |
|---|---|---|
| पदासाठी आवश्यक Qualifying exam मधील गुण (अंतिम वर्षाच्या गुणाच्या आधारे | मिळालेल्या एकुण गुणांच्या टक्केवारीचे ५० प्रमाणे Proprtion काढावे. (उद. ६०% गुण प्राप्त असल्यास त्यांचे ५०% प्रमाणे (६० x ५०/१०० = ३० गुण) | ५० गुण |
| पदासाठी आवश्यक शैक्षणीक अर्हतेपेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता असल्यास (संबंधीत विषयामध्येच अधिकची शैक्षणीक अर्हता असल्यास विचारात घ्यावी | अधिकतम २० गुण द्यावेत. मिळालेल्या एकुण गुणांच्या टक्केवारीचे २० प्रमाणे Proprtion काढावे. (उदा. १ Staff Nurse पदाची आवश्यक शैक्षणिक अर्हता पूर्ण करुन अतिरिक्त B.Sc (Nursing)हि शैक्षणीक अर्हता पुर्ण केलेल्या उमेदवाराने अर्ज केला असल्यास उमेदवारास B.Sc (Nursing) च्या अंतिम वर्षात ६०% गुण प्राप्त असल्यास त्यांचे २०% प्रमाणे (६० x २०/१०० = १२ गुण) | २० गुण |
| संबंधित पदाशी निगडीत अनुभव | प्रत्येक १ वर्षासाठी ६ गुण द्यावेत (१ वर्षकरिता ६ गुण जास्तीत जास्त ३० गुण) | ३० गुण |
| एकुण गुण | | १०० गुण |

१०) ज्या उमेदवारांना ग्रेड सिस्टीम CGPA/SGPA नुसार गुण मिळालेले आहेत त्यांनी अंतिम वर्षाच्या गुणांची टक्केवारी तसेच त्यांच्या विद्यापिठानुसार टक्केवारी काढण्याचे सुत्र अर्जा मध्ये नमुद करावेत. सदर माहिती न दिल्यास गुण दिले जाणार नाही.

११) अर्ज भरत असतांना अंतिम वर्षाच्या मिळालेल्या गुणांची टक्केवारी अचुकपणे नमुद करावी. ग्रेड अथवा अन्य श्रेणी नमुद न करता गुणांची टक्केवारी नमुद करणे आवश्ययक आहे. अंतिम प्रमाणपत्रा मध्ये ग्रेड अथवा श्रेणी नमुद असल्यास संबंधीत संस्थेकडुन त्यांचे गुणां मध्ये रुपांतर करुन ते प्रमाणीत करुन घ्यावे व त्यांची स्वसाक्षांकित प्रत सादर करावी. तत्सम स्वरुपात कादपत्र सादर न केल्यास त्यास गुण देय राहणार नाही व त्या करीता निवड समिती जबाबदार राहणार नाही यांची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१२) जाहिरात प्रसिध्द झाल्या पासुन आपणा कडील सर्व प्रमाणपत्र जाहिरातीच्या अंतीम दिनांका पुर्वीच वैद्य असणे आवश्यक आहे.

१३) भरती प्रक्रिया स्थगीती देणे/ रदद करणे/ पदभरती प्रक्रियेत बदल करण्याचे अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. यवतमाळ यांच्या स्तरावर राखीव ठेवण्यात आलेले आहेत याबाबत कोणत्याही प्रकारचा दावा करता येणार नाही.

१४) उपरोक्त संबंधीत पदाकरिता तत्सम कॉन्सीलकडून रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक आहे.

१५) संपुर्ण निवडप्रकिया ही गुणवत्तेवर आधारीत पारदर्शी पध्दतीने घेण्यात येईल.

१६) वरील नमुद मुलाखतीच्या वेळापत्रका नुसारच नमुद दिनांकास नमुद पदाची पदभरती प्रक्रीया राबविण्यात येईल.

१७) मुलाखती करीता उमेंदवारांनी जिल्हा परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावर (www.zpyavatmal.gov.in) उपलब्ध अर्ज नमुण्यामध्ये अर्ज करणे आवश्यक राहील.

१८) मुलाखती करीता उपस्थित उमेदवारांचे सकाळी १०.३० ते दुपारी १.०० वाजे पर्यंत नोंदणी करण्यात येईल. उशिरा येणारे उमेदवारांची नोंदणी होणार नाही. नोंदणी झालेल्या उमेदवारांची मुळ कागदपत्रे तपासणी करुन पात्र उमेंदवारांची गुणानुक्रमे १ पदा करीता ५ उमेदवाराची प्रारुप यादी कार्यालयाचे सुचना फलकावर लावण्यात येईल.

१९) प्रारुप यादी नुसार गुणानुक्रमे उमेदवारांची निवड व प्रतिक्षा यादी कार्यालयाचे सुचना फलक व जिल्हा परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावर (www.zpyavatmal.gov.in)

२०) सदर पदाचे पदभरती प्रक्रिया बाबतचे सर्व अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यवतमाळ यांचे कडे राखीव राहील.

सदस्य सचिव

जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद, यवतमाळ

स्वा/-अध्यक्ष

मुख्य कार्यकारी अधिकरी
जिल्हा परिषद, यवतमाळ

# विनंती अर्ज

प्रति,<br>
जिल्हा आरोग्य अधिकारी<br>
जिल्हा परिषद, यवतमाळ

विषय :- ............................................पदासाठी अर्ज सादर करण्याबाबत

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | उमेदवराचे संपूर्ण नाव | अडनाव | पहिले नाव | मधले नाव |
| | | | | |
| | नावात बदल झालेले असल्यास | | | |
| २ | पत्रव्यावहाराचा कायमचा संपूर्ण पत्ता | ......................................................<br>तालुका ................... जिल्हा ...................<br>पिन कोड | | |
| ३ | ई-मेल | | भमणध्वनी क्र | |
| ४ | जात | | पोटजात | |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | अर्जाचा प्रवर्ग वर्गवारी (✓) | | | | | | | | | |
| | अजा | अ.ज | वि.जा (अ) | भ.ज (ब) | भ.ज (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र | इ.माव | ईडब्ल्यूएस | खुला |
| | | | | | | | | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | जन्मतारीख (अंकात) | | | |
| ७ | | वर्ष | महिने | दिवस |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ८ | अर्जदाराची शैक्षणीक पात्रत (उत्तीर्ण परीक्षेचा तपशील)या मध्ये फक्त अंतीम वर्षाचे गुणाची माहिती देण्यात यावी. | | | | | |
| अ.क्र | शैक्षणीक अर्हता | संस्थेचे नाव | एकुण गुण | प्राप्त गुण | टक्केवारी | उर्त्तीण वर्ष |
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |
| ३ | | | | | | |
| ४ | | | | | | |

| | | |
|---|---|---|
| ९ | कामाचा अनुभव असल्यास त्याबाबत माहिती (Govt./Semi Govt././NRHM) | |
| | कार्यालयाचे नाव व पत्ता :- | |
| | पदाचे नाव :- | |
| | कालावधी :- | |
| | सध्या कार्यरत आहे का (होय / नाही) | |
| १० | डि.डि. रु .................. | डि.डि. नंबर ............ |

मी.................................................... असे प्रमाणित करतो/करते कि मी जाहिरात योग्य रीतीने वाचली असुन मी .......................... या पदाकरिता अर्ज सादर केला आहे. मला जाहिराती मध्ये अटी व शर्ती मान्य आहेत. मी नमुद केलेली माहिती कोणत्याही टप्प्यावर चुकीची अगर खोटी आढळून आल्यास माझी उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रदद करण्यात येईल व माझा पदावर कोणताही हक्क राहणार नाही याची मला जाणीव आहे. तसेच या संदर्भात नियुक्ती अधिकारी जो निर्णय देतील ती मला मान्य राहील व होणाऱ्या कार्यवाहीस मी पात्र राहील आणि भरती बाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही. सदर पदे हि निव्वळ रोंजदारी पध्दतीने केवळ २९ दिवसा करीता भरण्यात येत आहे. यांची मला माहीत आहे व मला हे मान्य आहे.

स्थळ :–                                                  उमेदवाराची स्वाक्षरी

दिनांक :–

---

# <u>प्रतिज्ञापत्र</u>

# नमुना अ

मी श्री/श्रीमती/कुमारी ...................................................................

श्री.............................................................................यांचा/ यांची मुलगा /मुलगी / पत्नी वय ......... राहणार.............................................................

याद्वारे असे जाहिर करतो/करते की,

१) मी .................................... या पदासाठी अर्ज दाखल केलेला आहे.

२) आज रोजी मला ...........(संख्या) इतकी हयात मुले/मुली आहेत. त्या पैकी दिनांक २३ जुलै २०२० यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ................ आहे. (असल्यास जन्म दिनांक नमुद करावा)

जन्म तारीख १) .............................. २) ................................

दिनांक २३ जुलै २०२० रोजी हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २३ जुलै २०२० व तदनंर जन्माला आलेलया मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल. याची मला जाणीव आहे.

ठिकाण :–

अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी

दिनांक :–

# प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान (पीएम–जनमन) अंतर्गत मोबाईल मेडीकल युनिट करीता

# रोजंदारी पध्दतीने पदभरती करीता थेट मुलाखत

प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान (पीएम–जनमन) योजने अंतर्गत जिल्हयात राबविण्यात येणाऱ्या मोबाईल मेडीकल युनिट मध्ये खालील पदे रोजंदारी पध्दतीने केवळ २९ दिवसा करीता भरणे करीता खालील पदांसाठी पात्र उमेदवारांकडून थेट मुलाखती करतीा अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र | पदनाम | रिक्त पद संख्या | शैक्षणीक अर्हता | प्रति दिवस मानधन |
|---|---|---|---|---|
| 1 | Medical Officer (Female) MBBS/AYUSH | **2** | MBBS/AYUSH पदवी असणे आवश्यक, कॉन्सिलचे नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक राहील. | १२९०/- |
| 2 | Pharmasist<br>औषध निर्माण अधिकारी | **2** | DPharm/Bpharm<br>कॉन्सिलचे नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक राहील. | ५८१/- |
| 3 | Staff Nurse<br>अधिपरिचारीका | **2** | GNM/BSc Nursing<br>कॉन्सिलचे नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक राहील. | ५८१/- |
| 4 | Lab Technician<br>प्रयोगशाळा तंत्रज्ञ | **2** | 12th Science + DMLT<br>MPC कॉन्सिलचे नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक राहील. | ५८१/- |

## थेट मुलाखतीचे वेळापत्रक

| अ. क्र | पदाचे नांव | थेट मुलाखती चा दिनांक | थेट मुलाखती चा वेळ |
|---|---|---|---|
| 1 | Medical Officer (Female) MBBS/AYUSH | १६/०६/२५ | सकाळी ११ ते ३ |
| 2 | Pharmasist<br>औषध निर्माण अधिकारी | १७/०६/२५ | सकाळी ११ ते ३ |
| 3 | Staff Nurse<br>अधिपरिचारीका | १८/०६/२५ | सकाळी ११ ते ३ |
| 4 | Lab Technician<br>प्रयोगशाळा तंत्रज्ञ | १९/०६/२५ | सकाळी ११ ते ३ |

**अटी व शर्ती :-**

**विशेष सुचना = सदर पदे ही केंद्र शासनाचे** प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान (पीएम–जनमन) अंतर्गत मोबाईल मेडीकल युनिटसाठी २९ दिवसा करीता निव्वळ रोंजदारी पध्दतीने भरण्यात येत आहे.

उपरोक्त पदाकरिता आवशक शैक्षणिक अर्हता व इतर आवश्यक माहिती करिता संपूर्ण जाहिरात व अर्जाचा नमुना जिल्हा परिषदेच्या संकेत स्थळावर **www.zpyavatmal.gov.in** वर प्रसिध्द करण्यात आले आहे. मुलाखती वेळापत्रका नुसार जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प यवतमाळ या कार्यालया मध्ये होईल

स्वा/–
सदस्य सचिव
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद, यवतमाळ

स्वा/–
अध्यक्ष
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, यवतमाळ